महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,

**पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

३ रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे- ४११००१

फोन नं ०२०-२६१२६६२८/२६१२६७८५/२६११४०६४

Email :- dirmktms.apmc@gmail.com dirmktms@gmail.com


जा.क्र.पणन-५/कृउबास/परिपत्रक/भेसळ प्रतिबंध/सन२०२६/1636 दिनांक :- ०८ मे.२०२६

**वाचावे**:-

१. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम २९,४६ मधील तरतुदी.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) नियम, १९६७ मधील नियम २१, २२, २४, २५ मधील तरतुदी.

३. या कार्यालयाकडील जा.क्र.पणन-५/कृउबास/प्लास्टिक/वापर बंदी/सुचना/१८८३ दि.०५/२०२२ रोजीचे परिपत्रक.

**विषय**:- राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, खाजगी बाजार येथे व थेट पणन द्वारे खरेदी-विक्री होणाऱ्या शेतमालामध्ये भेसळ व रासायनिक प्रक्रिया करणेस प्रतिबंध करणेबाबत.

## -: परिपत्रक :-

बाजार क्षेत्रात शेतीच्या व इतर विवक्षित उत्पन्नाच्या खरेदी-विक्रीचे नियमन आणि त्यासाठी स्थापन करावयाच्या बाजाराचे नियमन करणे, अश्या बाजाराशी संबंधित असलेल्या प्रयोजनासाठी कार्य करण्याऱ्या कृषि उत्पन्न बाजार समिती, थेट पणन परवाना धारक, खाजगी बाजार यांना शक्ती प्रदान करणे यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये तरतुदी नमुद आहे. शेती उत्पादकाचा माल योग्य रितीने विकला जावा, तो फसविला जाऊ नये तसेच खरेदीदाराला एकत्रित माल मिळुन सरस नीरस प्रत ठरविणे सोयीचे व्हावे, चांगल्या दर्जाचे शेतीमालाचे उत्पादन होण्यास उत्तेजन मिळावे इत्यादीसाठी नियंत्रित बाजार क्षेत्रांची स्थापन करण्यात आले आहे. उक्त अधिनियमातील कलम ५ड अन्वये थेट पणन परवाना, खाजगी बाजार, शेतकरी ग्राहक बाजार स्थापन करण्यासाठी, शेतमाल खरेदी-विक्रीसाठी तसेच त्या अनुषंगाने प्रक्रिया व इतर बाबींसाठी परवाना घेऊन व्यवहार करता येतील.

बाजार समित्यांनी त्यांच्या बाजार क्षेत्रात खरेदी-विक्री होणाऱ्या शेतमालाच्या व्यवहाराच्या सोयीच्या दृष्टीने आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे बाबत कलम २९ मध्ये तरतुदी नमुद

कृषि उत्पन्न बाजार समिती
पारनेर, जि.अहमदनगर
आवक क्र---३५---
दिनांक:- ०८/०५/२०२६

श्री येवले साहेब

आहेत. बाजार क्षेत्रातील शेतमाल खरेदी-विक्री संबंधाने भेसळ टाळण्यासाठी, वजन - मापे याबाबत तक्रारी उद्भवल्यास त्याचे निराकारण करण्यासाठी वाचावे क्र. २ मध्ये नमुद तरतुदी नुसार कार्यवाही करता येईल.

सबब, कृषि उत्पन्न बाजार समित्या, खाजगी बाजार व थेट पणन परवाना धारक यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते कि, त्यांच्या संबंधित बाजार क्षेत्रात शेतमाल खरेदी-विक्री व्यवहारामध्ये फळे कृत्रिमरित्या पिकविण्यासाठी आणि त्यांची गोडी वाढविण्यासाठी कृत्रिम रसायनांचा वापर करणे, फळे-भाजीपाला व अन्नधान्य यांना कृत्रिमरित्या रंगविणे, फळे-भाजीपाला व इतर शेतीमाल दिर्घकाळ टिकविण्यासाठी तसेच आकर्षक दिसण्यासाठी घातक रसायनांचा वापर करणे इत्यादी बाबी टाळण्यासाठी वेळोवेळी परवाना धारक व्यापारांची काटेकोरपणे तपासणी करुन आवश्यक उपाययोजना करावी. दैनंदिन भाजीपाला, फळे, फुले यांची विक्री, वाहतुक, साठवण, यासाठी विहीत जाडीपेक्षा कमी प्लास्टिक व थर्माकोलचा वापर टाळून पर्यावरणपुरक साहित्याचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. अन्नधान्यामध्ये आणि फळे-भाजीपाला यामध्ये भेसळ/घातक रसायनांचा वापर केला असल्याचा संशय असल्यास अशा शेतमालाच्या तपासणीसाठी अन्न व औषध प्रशासन विभागाशी समन्वय साधून दोषी व्यक्तीविरुध्द अन्न सुरक्षा आणि मानके कायदा,२००६ अन्वये कारवाई प्रस्तावित करावी. अन्न भेसळ करणाऱ्या परवाना धारकांचा परवाना रद्द करण्याची व त्या परवाना धारकास उपलब्ध करुन दिलेल्या सोयी-सुविधा काढून घेण्याबाबतची कार्यवाही त्या त्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत तात्काळ होईल याची दक्षता घ्यावी.

8/5/2020

(शरद जरे)
पणन संचालक
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना:**

१. सभापती/सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, (सर्व)
२. अध्यक्ष, खाजगी बाजार समित्या, (सर्व)
३. थेट पणन परवाना धारक, (सर्व)

**प्रत** - १.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
२.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
/- यांना सूचित करण्यात येते कि, उपरोक्त परिपत्रकीय सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

१. मा. प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, अन्न व औषध प्रशासन भवन, सर्वे नं. ३४१, वांद्रे-कुर्ला (पुर्व) संकुल, मुंबई.